
ओक घराण्याच्या प्रारंभापासून
१९ व्या शतकाच्या अखेरपर्यंतचा
आधारभूत लेखांसह

# ओक घराण्याचा इतिहास

लेखक
भगवान प्रभाकर ओक



ओक घराण्याच्या प्रारंभापासून
१९ व्या शतकाच्या अखेरपर्यंतचा
आधारभूत लेखांसह

# ओक घराण्याचा इतिहास

लेखक
भगवान प्रभाकर ओक

प्रकाशक :

भगवान प्रभाकर ओक
१५२३, सदाशिव पेठ
टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०

★

मूल्य रु. ३८·००

★

प्रकाशन दिन :
कार्तिक पाडवा, शके १८९८
दिनांक २५ ऑक्टोबर, १९७६

★

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

माझ्या ज्येष्ठ भगिनी

**ती. लक्ष्मीबाई तथा माई भट**

( जन्म दि. २९-८-१८९१ )

यांचा

## आशीर्वाद

चि. रा. भ. प्र. ओक ऊर्फ तात्यासाहेब ओक यांनी ओक घराण्याचा इतिहास लिहिला आहे. तो मी वाचून पाहिला. मला आवडला. मी शिकले वगैरे नाही. परंतु वयाची सत्तरी झाल्यावर परिश्रमपूर्वक त्यांनी जे लिखाण केले आहे त्याचे कौतुक केल्याशिवाय राहवत नाही. पेशा इंजिनिअरचा, भाषेशी संबंध कमी तरीही ग्रंथ चांगलाच सजला आहे. ओक हे आडनाव कसे पडले याचा शोध घेऊन पुढेही वेगवेगळया तीर्थक्षेत्री जाऊन उपाध्यांकडल्या कागदपत्र वहया पाहून लिहिण्याचे फारच श्रम घेतले आहेत. वेगवेगळया लोकांचे त्यांना उत्तम अभिप्राय मिळतील अशी माझी खात्री आहे. इतिहास संशोधक मंडळानी व विद्वानांनी अभिप्राय देणे वेगळे व माझ्यासारख्या सामान्य बुद्धीच्या बाईनी तेच करणे म्हणजे वाचकांना हास्यास्पद वाटेल. तरीही त्यांचे परिश्रम व पुस्तक आवडल्यामुळे हे धाडस केले आहे. पुस्तकाला प्रसिद्धी मिळो हीच इच्छा.

बालवयात मोडीचा अभ्यास तसेच संध्या वगैरे संस्कृतशी आलेला परिचय यामुळे त्यांना मदतच झाली आहे.

**ल. भट**

---

माझा हा उद्योग चालू असता
काही आप्तानी व परिचितानी माझी प्रशंसा केली
त्यामुळे संतोष वाटला.

---

तरीपण

माझे ज्येष्ठ बंधू

**कै. ती. बापूसाहेब**

यांची या पुस्तकाच्या अथपासून पृ. १३१ च्या अंतापर्यंत आठवण येत होती

**त्यांना हे अभिवादन**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| लेखकाचे निवेदन | पाच |
| ओकांची स्थलांतरे | दहा |
| कालापव्यय | बारा |
| समर्थांचे समर्थन— | चौदा |
| दोन जुने कागद छायाचित्रे | अठरा |
| आद्य कुटुंब | १ |
| विजयनगरचा रामराजा कानडा | ४ |
| ओक नावाची संभाव्य उपपत्ती | १२ |
| उपआडनावे | १५ |
| पालशेतचे महाजन | २१ |
| कोतळूककर ओक | २५ |
| महादाजी खंडेराव ओक | २९ |
| सावनूरचे दिवाण खंडेराव | ३३ |
| पांगारकर ओक | ३५ |
| वेळंबकर देशमुख ओक | ३९ |
| मळणकर ओक | ४५ |
| आनंदीबाई पेशव्यांचे माहेर | |
| प्रसिद्ध माहितीतील चुका | ५१ |
| बोरगावकर ओक | ५९ |
| कोळथरे वंश | ६६ |
| बागबुरोंडीकर ओक | ७३ |
| नरवणकर ओक | ८४ |
| हेदवी ओक | ९१ |
| बामणोलीकर ओक | ९५ |
| अखेरचे पेशवे व ओक | १०३ |
| आद्य महाविद्यालयाचे | |
| आद्य प्राचार्य ओक | १०५ |
| ओकांची देवालये | १०८ |
| बदलापूरचे ओक | ११२ |
| आमचे चुलते व वडील | १२४ |
| नकाशे | १३२ |
| वंशावळी | १३६ |
| अधारभूत लेख | २२३ |
| अपरिचित शब्दांचे अर्थ | ४४२ |
| संदर्भ ग्रंथ | ४६५ |
| सूची | ४४७ |
| शुद्धिपत्र | ४६८ |

# लेखकाचे निवेदन

कुलवृत्तान्ताचे अध्वर्यु श्री. परांजपे शास्त्री यांनी सन १९७० मधे एक दोन वेळा सुचविले की मीं ओकांचा कुलवृत्तान्त लिहावा. हे कळल्यावर माझे ठाण्याचे वकील बंधू चि. वामनराव यांनी त्र्यंबकेश्वरच्या आमच्या तीर्थोपाध्यायांकडील बदलापूरच्या ओकांच्या नामावल्या आणवून ठेविल्या होत्या. त्या माझ्याकडे दिल्या व अशा तऱ्हेने मी या कामात ओढला गेलो व नंतर त्यात रमलो.

ओक मंडळींना स्वतःची माहिती पाठवावी अशी मीं विनंती केली; पण त्यास फारसा प्रतिसाद मिळाला नाही. ज्या काही थोडया ओकांनी माहिती पाठविली ती उपयुक्त होती. त्याखेरीज अन्य ठिकाणांहून मी ओकांविषयी पुष्कळ जुनी माहिती गोळा करू शकलो व म्हणून हा इतिहास लिहिण्यास सुरवात केली. अवश्य तितक्या माहिती अभावी कुलवृत्तान्त लिहिण्याचे काम मागे पडले.

चित्पावन कोकणात कधी व कोठून आले याबद्दल बऱ्याच विद्वानांचे विभिन्न कयास प्रसिद्ध झाले आहेत. चित्पावन भारतात कसेही अस्तित्वात आले असोत पण त्यांपैकी काहीं कुटुंबे दक्षिणेतील हिंदुराजांकडे तेराव्या शतकात गेली होती ( पहा पृ. ४ व ५ ) त्याकाळी आडनावांची फारशी प्रथा नव्हती. अशा काळात विजयनगरच्या राजाजवळ असलेले एक चित्पावन कुटुंब आउक गावाहून त्यावेळच्या जंगलव्याप्त कोकणात वसाहत करण्यासाठी आले व तेव्हापासून औक या गावाहून आलेले हे कुटुंब ओक आडनावानी ओळखले जाऊ लागले व ओक घराण्याचा प्रारंभ झाला.

ओक घराण्यातले पुरुष चौदाव्या शतकापासून कोकणात नवी वसाहत करून तेथील लुटारू लोकांचा बंदोबस्त करण्यात यशस्वी झाले होते. ओक घराण्याची पाळेमुळे इतकी खोल असताना श्री. ना. ग. गोरे हे मावळंकर घराण्याच्या इतिहासाच्या प्रस्तावनेत म्हणतात ( पहा पृ. चौदा ) की मावळंकर घराण्याइतकी चित्पावनांची पाळेमुळे खोल गेलेली नाहीत व काही नमूद करून ठेवण्यासारखे थोडेबहुत कार्य त्या घराण्याकडून अलीकडल्या काळातच होऊ लागले. या श्री. गोरे यांच्या विधानास हा ओक घराण्याचा इतिहास हे एक उत्तरच आहे. ओक कोकणात आडपंचा लावून पाटाचे पाणी फक्त मोडीत बसले नव्हते ( पहा पृ. पंधरा ) हे दिसून येईल.

“ हल्लीच्या चित्पावन पिढीचे पणजे सर्व भिक्षुकच होते असे शोधाअंती समजून येईल ” असे एक विधान श्री. नानासाहेब चापेकर आपल्या चित्पावन या पुस्तकात ( पहिली आवृत्ती सन १९३८ ) सन १९६६ च्या आवृत्तीत पृ. ४५–४६ वर करतात.

आजच्या ब्राह्मणात भिक्षुक व गृहस्थ हा भेद उत्पन्न झाला असे ते लिहितात. पंजोबांचा काळ म्हणजे पेशवाईचा काळ असे मानले पाहिजे. पेशवे, त्यांचे मुत्सद्दी, लढवय्ये सरदार ह्या चित्पावन मंडळींची नावे तोंडासमोर असताना श्री. नानासाहेब यांच्या या विधानाचा अर्थबोध होत नाहीं. पण त्या अनुषंगाने ओक मंडळींनी त्या कालात व त्यापूर्वीच्या काळात भिक्षुकीखेरीज काय केले याचा या इतिहासावरून आढावा घेणे बोधप्रद होईल.

ओक घराणे इतिहासात मोठे नावलौकिकाला चढले होते असे नाही. कोकणातील जंगल तोडून तेथे वसाहती करण्याकरिता जी काय अग्रणी कुटुंबे होती त्यात ओक हे एक कुटुंब होते. सन १५५० पूर्वी ओक व्यापार करीत होते. त्यावेळीं गुंडांचा फार त्रास होई. त्यांचा ओकांनी नायनाट केला व देशमुखी संपादन केली. देशमुखीसाठी मिळालेल्या गावांचे ते खोत झाले. पण उपाध्येपण अन्य कुटुंबाकडे असे. बामणोली व बोरगाव येथील खोतांचे उपाध्येपण खरे यांच्याकडे कित्येक पिढया चालू होते. स्वतः ओक भिक्षुकी करीत नव्हते. संभाजी महाराजांच्या वधानंतर उठाव करण्यात एक ओक सहभागी झाले होते व त्या कैफात त्यांनी आपल्या भाऊबंदांचेही हाल होत आहेत याकडे दुर्लक्ष केले.

वरसईचे राघो हरी शिलेदार होते. त्यांचे बंधू येसाजी हरी शिलेदार झाले; पण कित्तूरच्या बाजूला ते लढाईत मारले गेले व पागा-पथकांची शिलेदारी गणेश हरींकडे आली. कुरुंदवाडकरांकडील फौजेतही ओक होते. दक्षिणेकडील शत्रूंना तुंगभद्रा ओलांडून अलीकडे येण्यास प्रतिबंध करण्यासाठी एका ओकांची इटगे येथे स्थापना केली होती. आनंदीबाई पेशव्यांचे वडील राघो महादेव ओक हेही शिलेदार होते. गंगाधर बाबुजी ओंकार हे पानिपतच्या रणांगणावर लढता लढता नाहीसे झाले.

सांगली–मिरजेच्या संस्थानातील फडनीस, अवचितगडचे फडणीस, तळे-राजपुरीचे मामलेदार, नाशिकचे मामलेदार अशा कामांवरही ओकांच्या नेमणुका होत्या. गोपिनाथ शास्त्री दीक्षित यांचे सारखे विद्वान शास्त्री हे ओकच होते. सन १५९० पूर्वीही ओकांना पालखी अफ्तागिरीचा मान व त्याकरिता नेमणूक होती त्याचप्रमाणे पुढील काळातही ओकांना हा मान मिळालेला आहे.

कित्येक ओक पेशव्यांचेही सावकार होते. ओंकार असेच एक सावकार होते व व्यापारही करीत. सन १८२० मधे रघुनाथ चिमणाजी हे पुण्यात तपकिरीचा धंदा करीत होते. १७७३ मधे नारोबा नाईक ओक हे पुण्यात कापड व्यापारी होते.

अशा तऱ्हेने ओकानी भिक्षुकी खेरीज अन्य क्षेत्रात आयुष्य व्यतीत केले होते.

**कृतज्ञता :–** ओक मंडळींखेरीज इतरांनी मला या कामात साहय केले त्यांना प्रथम अभिवादन करतो. त्रिंबकेश्वरचे आमचे उपाध्याय वे. विश्वनाथ भट केशवभट फडके यानी आपल्या घरच्या वहया तर दिल्याच; पण त्यांचे खेरीज ओकांचे जे इतर

उपाध्याय होते त्यांचेकडीलही वह्या आणून दिल्या. पुण्याहून मी त्यांचेकडे वेळोवेळी पत्राने काहीं माहिती मागविली तीही त्यानीं पुरविली.

वे. गणेश शास्त्री नारायण शास्त्री पाळंदे, वाराणसी, यानी वाराणसीतील ओकांच्या घरी नेले, ओंकारांच्या तीर्थोपाध्यायांच्या गाठी घालून दिल्या. त्यापैकी पोतनीस विठ्ठल मंदिराजवळ रहाणारे वे. पटवर्धन यानी माझी गाठ माझ्या मुक्कामी येऊन घेतली व ओंकारांच्या काशीतील वाड्याबद्दल माहिती दिली.

पुण्याचे श्री. यशवंत नरसिंह केळकर यानी त्यांचेकडील प्रचंड संख्येने असलेल्या संग्रहातून ओकांची नावे हुडकून मजकडे वेळोवेळी आणून पोचविली व माझ्या या उद्योगास प्रोत्साहन दिले.

प्रो. डॉ. बी. डी. वर्मा यांनी फारसी पत्राचे सविस्तर भाषांतर लिहून पाठविले.

प्रा. ग. ह. खरे यानीही त्या पत्राची चिकित्सा करून भाषांतर मला सांगितले.

श्री. सेतुमाधवराव पगडी यानी ते पत्र व इतिहासात छापलेले त्या पत्राचे भाषांतर ताडून पाहून ते बरोबर असल्याचा निर्वाळा दिला.

श्री. पु. वि. देवधर रा. वेळंब, यांनी माझ्या मागणीवरून गुहागरच्या फोटोग्राफर-करवी पालशेतच्या केशवाच्या मूर्तीचे फोटो काढून त्याचे नेगेटिव्ह मला माझ्या पुण्याच्या बिऱ्हाडी स्वतः आणून दिले. श्री. केशवराव गोडबोले, फोटोग्राफिक्सचे चालक, यानी नेगेटिव्हवरून सुस्पष्ट प्रिन्ट कौशल्याने काढून दिले.

श्री. हिंगवे, ग्रंथपाल पुणे विद्यापीठ व सौ. प्रमिला देवधर, ग्रंथपाल डेक्कन कॉलेज यानी काही पुस्तके वाचावयास दिली.

श्री. करकरे, ग्रंथपाल, केसरी मराठा ग्रंथालय यानी मला पाहिजे असलेल्या टिळकांच्या कल्याण भेटीचे वेळच्या नेगेटिव्ह वरून फोटो काढवून दिला व सन १९०५ व १९०६ या वर्षांचे केसरीचे अंकहीं चाळून पहाण्याची सोय केली.

श्री. य. ना. वैशंपायन, बी. ई. यांनी त्यांच्या सासुरवाडच्या ओक घराण्याच्या कागदाचे उतारे घेऊ दिले. श्री. शिवरामपंत आगाशे यानी आगाशे राममंदिराच्या जागेच्या खरेदीबद्दलच्या कागदातील उतारे घेऊन दिले.

प्रा. ना. र. दांडेकर, चिपळूण यानी मजबरोबर चिपळूणमधील व गुहागर तालुक्यातील पाच गावातील ओकांचे घरी हिंडून माहिती मिळवून दिली.

श्री. वि. पु. शिंत्रे वकील, मित्रमंडळ वसाहत पुणे, यांनी श्री. गो. ग. आचवल यांचे संग्रहातील कागद दिले.

सर्वसाधारण ओक मंडळीत जरी कुलवृत्तान्ताच्या बाबतीत उत्साह दिसला नाही तरीपण इतिहास लिहिण्याच्या कामीही उपयोग होऊ शकला अशी माहिती ज्यांचेकडून मिळाली त्या ओक मंडळींचा नामनिर्देश—श्रीमती पद्मावतीबाई बाळकृष्ण; सर्वश्री :— अनंत

मोरेश्वर, निळकंठ गणेश ऊर्फ बंडोपंत, गोविंद गंगाधर, काशिनाथ परशराम, जनार्दन वासुदेव, नारायण गजानन, डॉ. दत्तात्रय केशव, विष्णु रामचंद्र, वामन गणेश, बापूराव महाजन (ओक), कै. दि. रा. ओक, शंकर पांडुरंग, सुरेंद्र केशव, शंकर विष्णु, कृष्णाजी वासुदेव, केशवराव गोविंद, कै. दत्तात्रय नारायण, सिताराम चिंतामण, रंगनाथ हरीपंत, लक्ष्मण बळवंत, माधव मोरेश्वर ओंकार, चि. बा. ओंकार, प्रमोद गणेश, ग्रूप कॅप्टन दामोदर माधव ( निवृत्त ) या व अशा अन्य मंडळींचे मी आभार मानतो.

हा इतिहास वाचून श्री. य. न. केळकर व जस्टिस वि. गो. ओक, आय्. सी. एस् ( निवृत्त) यांनीं अभिप्राय लिहून दिले व श्री. ग. ह. खरे यानी याचे परीक्षण केले त्याबद्दल त्या सर्वांचा मी आभारी आहे. वाचकांनी निर्विकार मनाने इतिहास वाचून त्याची पारख करावी म्हणून अभिप्राय या पुस्तकात छापले नाहीत.

इतिहास लिहिण्याचे व वंशावळी जुळविण्याचे काम सन १९७२ पासून सुरू झाले. दोन्हींची मुद्रणप्रत सन १९७५ मधेच तयार झाली होती, त्याअगोदर ज्यांचेकडून चालू पिढीची माहिती मला पोचली नव्हती अशी नावे वंशावळीत समाविष्ट होऊ शकली नाहीत; याबद्दल क्षमा असावी.

जुन्या मोडी कागदपत्रातील अक्षरांचे वळण, त्या काळचे व ऐतिहासिक शब्दांची माहिती नसल्यामुळे उतारे घेण्यात चुकीचे शब्द लिहिले गेले असतील याची जाणीव आहे. पण ओकांच्या इतिहासास अवश्य ती माहिती त्यातून घेण्यास तसल्या चुका आड आल्या नाहीत.

ओकांची स्थलांतरे कशी झाली याचे पुण्याचे श्री. प्रमोद गणेशनी केलेले आकृतिबद्ध चित्रण या निवेदनानंतर दिले आहे. सूची त्यानीच तयार केली व गेले सहा महिने रोज मजकडे येऊन शुद्धिपत्र, संदर्भ ग्रंथांची यादी इत्यादी कामात निरलसपणे मदत केली.

**क्षमायाचना :** देवाची पूजा करतात ती देवाला पाहिजे असते म्हणून करतात असे नाही. पूजाकरणारा आपणास सुख समाधान लाभावे म्हणून, शक्य ते पूजासाहित्य जमवून, मनोभावे पूजा करतो व पूजेच्या शेवटी

> आवाहनं न जानामि न जानामि तव अर्चनं ।
> पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर ।।
> मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर ।
> यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे ।।

अशी क्षमायाचना करतो त्याचप्रमाणे मीही क्षमेची याचना करतो. शाळेतील परीक्षेसाठी केलेल्या व आता विसरलेल्या इतिहासाव्यतिरिक्त मला इतिहासाचे ज्ञान नाही, इतिहासाची परिभाषा समजण्या उमगण्याइतकी तपश्चर्या नाही, शुद्धाशुद्ध लेखनाचा सराव नाही, असे असताना, मी यथाशक्ति साहित्य गोळा करून व मन लावून अभ्यास

करून हा इतिहास रचण्यास उद्युक्त झालो व कोणास पाहिजे कि नाही याचा विचार न करता मी लेखन पुरे केले ते माझ्या कुवतीप्रमाणे परिपूर्ण असो.

लिहिलेल्या इतिहासात चुका झाल्या असतील किंवा राहिल्या असतील, कोणाबद्दल उणे-अधिक लिहिले गेले असेल, कोणाची अभावितपणे उपेक्षा झाली असेल किंवा कोणाचे मन वा भावना दुखावल्या गेल्या असल्या तर त्याबद्दल मला क्षमा करावी अशी नम्र प्रार्थना आहे.

**भ. प्र. ओक**

# ओकांची स्थलांतरे

विजयनगरच्या ( हल्लीचा आंध्रप्रदेश ) राज्यातील औक गावाहून निघाल्यापासून १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत ओक मंडळीचे स्थलांतर कसे झाले ते तीर्थोपाध्यायां-कडील उताऱ्यावरून बनविलेल्या खालील आकृतीवरून समजेल. सिद्रस, ब्रह्मवणेकर व पांगारकर ओक हे पालशेतच्या निरनिराळ्या भागात रहात असत पण ती निरनिराळी घराणी झाल्याने स्वतंत्र दाखविले आहेत. अशा प्रकारे स्थलांतरे रेखाटण्याची कल्पना श्री. प्रमोद गणेश ओक पुणे यांची आहे.

औक जि. कर्नुल ( आंध्रप्रदेश ) → पालशेत ( दक्षिणकोकण )

- नरवण
  - नागोठाणे
  - अवळस
  - मोहोपाडा
  - वाराणसी
  - गिम्हवणे
  - हेदवी
    - सुब्रह्मणी (उडुपी)
    - अंजार (उडुपी)
    - हर्णै
    - नागपूर
    - शिरहट्टी
- पांगारकर ओक ( पालशेत )
  - यवतमाळ
  - धार
  - इंदूर
  - चिकोडी
  - सौंदत्ती
  - वसई
  - महाड
    - जांभूळपाडा
    - मेढे
    - रोहे
    - बिरवाडी
- ब्रह्मवणेकर महाजन ओक – पुणे
- सिद्रस महाजन ओक – पुणे

औक → पालशेत (दक्षिणकोकण) —
जि. कुर्नुल
ता. बनगनुपल्ली.
( आंध्रप्रदेश )

- कोतळूक — मुंबई
- बामणोली —
  - मोहोपाडा
  - अनगाव
  - वाघोली ( ओंकार )- पुणे
- शिवणे — बामणोली
- वेळंब —
  - बोरगाव — नाशिक
  - मळण — नाशिक
  - बागबुरोंडी —
    - कुरुंदवाड
    - इटगी
    - पुणे
    - धानोर-सोनगाव
    - वरसई
    - सांगली-मिरज
  - कोळथरे —
    - त्र्यंबकेश्वर
    - पुणे
    - अनगाव
    - बदलापूर

बारा

# कालोपव्यय

श्री. ना. गो. चापेकर यांच्या जीवन कथा–आत्मचरित्र–या पुस्तकातील पत्र.

श्री मुंबई, गिरगाव बॅकरोड
१ मार्च १९०८

रावसाहेब नारायणराव चापेकर,

साष्टांग नमस्कार वि. वि. सध्यां तुमची पदवी माझे गुरु होण्यासारखी मोठी आहे, हें मला ठाऊक आहे आणि मान्य आहे. तरी कांहीं वर्षांमागे मी तुमचा, अल्प-प्रमाण गुरु होतों, तें नातें मनांत आणून, आणि त्या नात्यानें तुम्हीं मजशीं वागतां, हें पाहून तुम्हांस मी ह्या दोन ओळी लिहीत आहें, ह्यांचा तुम्हीं विचार करावा.

परमेश्वरकृपेनें तुम्हांला सुविद्या पुष्कळ प्राप्त झाली आहे. आणि स्वभाषेंत ग्रंथ लिहिण्याची शक्ति, जी अलिकडच्या बहुतेक पदवीधरांस असाध्य आहे, ती तुम्हाला देवानें चांगली दिली आहे. तुमची मराठी भाषा चांगली शद्ध असते. तुम्हांला आपले विचार मराठींत अगदीं सरळ रीतीनें चांगले प्रगट करितां येतात. त्यांत संदिग्धता नसते. दूरान्वय नसतो. रचना व्याकरणशुद्ध आणि सरळ असते. अशी शक्ति आणि तिचा उपयोग करण्याची उत्सुकता, माझ्या पांच चार हजार लहान मोठया विद्यार्थ्यांमध्ये तुमच्या एकटयाच्याच ठायीं मला आढळते. आणि तिजमध्यें माझ्या परिश्रमाचा एकदश लक्षांश किंवा एक दशकोटयांश तरी हिस्सा असावा असें मनांत येऊन अभिमान वाटतो. तो यथार्थ असो किं नसो, पण आपण मराठी लिहिणारे गृहस्थ कोणी वर, कोणी खालीं, असे एका पंक्तीस बसलों आहों, आपणास जें काय विशेष कळेल, तें आपल्या देश-बंधूंस सांगून, त्यांच्या ज्ञानात भर घालावी, आणि तद्द्वारां त्यांस सध्यांच्या स्थितीस आवश्यक असें कर्तव्य करण्यास अल्पस्वल्प साह्य करावें हा मुख्य उद्देश आहे हें तुम्ही कबूल करालच. तेव्हा ह्या उद्देशास प्रतिकूल असें जें काय आपणा कोणाच्या हातून, भ्रमानें म्हणा कीं चुकीनें म्हणा, होत असेल, त्याविषयीं परस्परांस सूचना करणें हें आपलें कर्तव्य आहे असें मनात येऊन, ४३ आख्यायिकांविषयीं दोन शब्द लिहितों. ह्या आख्यायिका घेण्याचें कारण असें आहे कीं, त्या अगदीं ताज्या आहेत. आणि त्यांच्या संबंधानें जें काय म्हणावें तें त्यासारख्या सगळया प्रकारच्या लेखांस लागू पडण्या-सारखें आहे. तर ह्याविषयीं पहिला प्रश्न हा कीं, ह्या वाचल्यापासून कोणतें उपयुक्त ज्ञान आपल्या लोकांस मिळावयाचें आहे ? कोणतेंही नाहीं, मनोरंजन तरी व्हायाचें आहे काय ? तेंही नाहीं. तर मग हे लिहिण्याचे श्रम तुम्हीं घेतले कशाला ? आफ्रिकेंतल्या एका विलक्षण सर्पाचें वर्णन वाचणें आणि हें वाचणें सारखेंच नव्हे काय ? म्हणून त्याविषयीं तुम्हांस असें विचारणें आहे कीं सरकारी काम संभाळून, खासगत वेळ तुम्ही इकडे घालवितां तो कशाकरितां ? ह्या आख्यायिका साधारणपणें कोणालाहि वाचाव्याशा वाटायच्या नाहींत. कां कीं त्यांत सध्या उपयोगी पडण्यासारखें ज्ञान नाहीं कीं मनोरंजन

नाहीं. मग तुम्ही आपला अमोल वेळ ह्यांत कां खर्चितां ? मेहनत व्यर्थ कां करितां ? इंग्लिश लोक कोणत्या उद्योगांनीं उदयास आले ? त्यांनी आपणांतलें अज्ञान कसें घालविलें ? लोकमत-सामर्थ्य कसें वाढविलें इ. विषयांचे ज्ञान सध्याच्या स्थितींत अतिशयित उपयोगी पडावयाचें आहे. तें लेखनद्वारां त्यांस जे कोणी देतील त्यांचे त्यांवर मोठे उपकार होतील. आणि त्या लेखनश्रमाचें सार्थक्य होईल. ह्याचा विचार तुम्ही करा. आधींच आमच्या नव्या मंडळींत स्वभाषेंत चांगलें लिहिणारे तुमच्यासारखे लोक कमी—फार थोडे. आणि ते जर अशाप्रकारें आपल्या सामर्थ्याचा असद्व्यय करूं लागले, तर पुढें व्हावें कसें ? गरीबास–अन्नान्न गति आहे अशा मनुष्यास एखाद्यानें एक रुपया द्यावा आणि त्यानें तो रबराचा चेंडू विकत घेऊन उडवावा, अशासारखें हें आमच्या सुशिक्षितांचें करणें मला दिसतें. तें तुम्हांस राग येणार नाहीं अशा समजुतीनें स्पष्टपणें लिहिलें आहे. आमच्या तरुणांस भाकडकथा वाचावयास वेळ नाहीं आहे. रिकामा वेदान्त कुटींत बसण्यास किंवा निरुपयोगी माहिती वाचींत बसण्यास अवकाश नाहीं आहे. भोंवतालचीं राष्ट्रें स्वकल्याणार्थ करितात तें करावयाचें पुष्कळ आहे. तें कसें करावयाचें हें त्यांस पढवा. आणि त्यांत उपयुक्त ज्ञान संपादणें हें मुख्य आहे. हें सर्व मनांत आणून तुम्ही आपला पुढील लेखनक्रम ठेवावा अशी तुम्हांस विनंति आहे. बरेंच लांब पत्र झालें हें आतां आटपतों. ह्यांत कांहीं अतिक्रम झाला असल्यास क्षमा करावी. लोभ असावा हे विनंति.

तुमचा एक जुना मित्र
विनायक कोंडदेव ओक

ता. क.—ह्या संबंधानें तुमचें कांहीं विशेष उत्तर असल्यास मी मोठ्या आनंदानें वाचीन.

वि.

प्रस्तुत लेखकाची टीप : हा इतिहास साधारणपणे कोणालाही वाचावासा वाटायचा नाही व त्यापासून कोणाचे मनोरंजनही होणार नाहीं असे असता इतिहासलेखनाचा हा उद्योग मी करावा की नाही असे, वरील पत्र वाचून क्षणभर मनात आले. पण ‘ हे श्रम व्यर्थ घेऊन आपला अमोल वेळ खर्च करू नये ’ ही सूचना एका विद्वान लेखकास केली आहे. मजसारख्या सामान्यास ती लागू नाही. हा इतिहास जमवून लिहिण्यात मला श्रम तर झाले नाहीत उलट माझा चार पाच वर्षांचा हा काळ आनंदात गेला व या उद्योगापायी कोणास उपद्रव दिला नाही. शिवाय याखेरीज मला पेलेल असे अन्य उपयुक्त काम सुचलेही नसते व त्यामुळे तोही कालापव्ययच ठरला असता; अशी मनाची खरी-खोटी समजूत घालून मी आरंभिलेला व कदाचित न पेलणारा असा हा ओक घराण्याच्या इतिहासाचा प्रपंच पुरा केला आहे. घराण्यांच्या इतिहासाचे उपयुक्ततेबद्दल विचारवंतांनी समर्थनही केलेले पुढील पानांवर दिले आहे.

## समर्थांचे समर्थन

**लोकमान्य टिळक :** आपटे कुलवृत्तांत प्रसिद्ध झाल्यावर 'अनेक कुलांचे स्वतंत्र कुलवृत्तान्त बाहेर पडणे अवश्य आहे' असा लोकमान्यांनी अभिप्राय दिल्याबा।। मोडक कुलवृत्तान्तात उल्लेख आहे.

**जवाहरलाल नेहरू :** दि. १३-४-१९६० चा मावळंकर घराण्याच्या इतिहासावर अभिप्राय. It was a happy idea to trace the history of well known families in Maharashtra. This is not merely a record of notable persons, but all intimate story of a nation's development... The value of such family histories would depend greatly on how far they depict the social conditions of the age they deal with and not merely individual achievements.

I commend this enterprise.

**श्री. ना. ग. गोरे :** यांची प्रस्तावना मावळंकर घराण्याचा इतिहास....मावळंकर घराण्याच्या इतिहासात दिलेल्या बखरीहूनही जुना कागद म्हणजे सोळाव्या पिढीचे अंत नायक सैतवडेकर देसाई यानी विजापूरच्या बादशाहापासून मिळविलेला सन १५५३ चा कौलनामा. त्यामानाने चित्पावनी घराण्यांचे कुलवृत्तांत पाहिले किं त्यांची मुळे फार खोल गेल्याचे आढळत नाहीं. याचा अर्थ उघडच असा आहे की काही नमूद करून ठेवण्या-सारखे थोडेबहुत कार्य ह्या घराण्यांकडून अलीकडच्या काळातच होऊ लागले.....

हे कुलवृत्तान्त लिहिण्याचा उपयोग काय? असा एक प्रश्न निर्माण होतो. "कुलवृत्तान्ताचा उपयोग विवाह जुळविण्यात होतो" असे फार मामुली कारण डोंगरे कुलवृत्तांताचे प्रयोजन सांगणाराने दिलें आहे! पण कुलवृत्तान्त लेखक एवढया मामुली कारणासाठी इतका खटाटोप करण्यास प्रवृत्त होत असेल असे म्हणता येणार नाही एखाद्या कुळात कोणी थोर पुरुष होऊन गेले की ते सर्व कुलच्याकुल समाजात वर. उचलल्यासारखे होते. मग त्याची अस्मिता जागृत होऊन आपले काय काय आहे, कोठपासून कोठवर पसरलेले आहे ते पाहण्याची त्यातल्या एखाद्या व्यक्तीला इच्छा होत असावी. किंवा नावावरून व स्थळावरून एखाद्याचे कुतूहल जागृत होऊन तो त्याच्या मागावर निघत असावा. अमुक एका पिढीपासून अमुक एका गावी आपले घराणे स्थायिक झालेले असल्याचा धागा सापडतो. ज्या व्यक्तीपाशी तो धागा खुंटतो तो मूळपुरुष. पण तो तरी कोठून आला असेल? तो कोणत्या कारणास्तव आला असेल ही जिज्ञासा कायमच राहते......असे नाना प्रकारचे प्रश्न सुचू लागतात आणि आपल्याकडे समाजगटांचे परिभ्रमण समजून येण्यास उपयुक्त साधने इतकी तुटपुंजी असावीत याचे वाईट वाटते.

हे पूर्वकालीन धागेदोरे जर नीट हाती लागले असते तर हे वेगवेगळे दिसणा प्रवाह मूळ एकाच तळयातून फुटलेले पाट आहेत असा उलगडा झाला अस देशस्थापासून कऱ्हाडे वेगळे, कऱ्हाडयांपासून चित्तपावन वेगळे, त्यातही प्रत्ये मोठे पोटगट असला फुटीरपणा कदाचित माजला नसता.

स्पष्टच बोलावयाचे तर हे कुलवृत्तांत चाळू लागले की आपल्या समाज प्रकारचे दारिद्र्यच डोळयात भरते. ज्यांचे कुलवृत्तांत प्रसिद्ध झाले आहेत त्य कुळात कोणत्याही धंद्यात वा विद्येत चमकली अशी माणसे किती आढळतात? यो किती? मुत्सद्दी किती? मुलकी अधिकारी किती? कायदेपंडित, विद्वान, वृत्त कार, कलाकार किती? बहुतेक नन्नाचाच पाढा वाचावा लागेल. कोकणात असले तर वृत्तपंचा लावून पाटाचे पाणी मोडीत बसलेले आणि शहरात असले तर नाकावर चाळशी व कानावर बोरू ठेवलेले असेच बहुतेक सर्व लोक दिसतात. आता जरा कोठे वेगवेगळे पेशे व प्रवृत्ती ह्या घराण्यामधून उमटू लागलेल्या सापडतात. कसल्या भयंकर एकसाची समाजातून आपण बाहेर पडत आहोत याचे यथार्थ ज्ञान हे कुलवृत्तांत वाचून होते हा देखील फायदाच म्हणावयाचा.

त्या मानाने मावळंकर सरदेसायांचा कुलवृत्तांत बराच वेधक वाटतो......

या ग्रंथात मूळ कागदपत्र उद्‌धृत केल्यामुळे ग्रंथाला ज्याप्रमाणे वजन प्राप्त झाले आहे त्याचप्रमाणे त्याची रुचिही निःसंशय वाढली आहे......

मला तर असे सुचवावेसे वाटते कि सध्या उपलब्ध असलेल्या सर्व कुलवृत्तान्तांची समीक्षा कोणीतरी करावी म्हणजे सबंध मराठी समाजाची जरी नाही तरी त्या समाजा पांढरपेशा व पुढारलेल्या म्हणून मानल्या गेलेल्या वर्गाची सत्यस्थिति काय आहे ये यथार्थ चित्र आपल्यासमोर उभे राहील.

**म. म. प्रा. दत्तो वामन पोतदार :** ग्रंथसमीक्षण–मावळंकर घराण्याचा इतिह

........................................................................

असा विचार करावा की समाज म्हणतात तो वास्तविक अनेक घराण्यांचा मिळ बनतो. आणि अनेक कुटुंबशाखा मिळून एक घराणे तयार होते. एवढे नीट ध्य घेतले म्हणजे एखाद्या देशाचा किंवा राष्ट्राचा इतिहास म्हटला म्हणजे त्यातील घराण चेच एका विशिष्ट योजनेने तयार केलेले वृत्त होय हे कोणासही सहज पटण्य सारखे आहे. या दृष्टीने विचार केला तर कळून येईल की घराण्यांचा इतिहास हा देशाच्य हिताचा पायाच होय.......

असे समजू नये की कोणी अलौकिक व्यक्ति होऊन गेल्या म्हणून किंवा न जाण होतील म्हणून ही जुळवाजुळव करून ठेवावयाची :

छेः छेः तसे मुळीच नाहीं. आज सर्वसामान्य माणसाचे युग आहे. तेव्हा या माणसाचे स्वरूप, विकास, स्थित्यंतरे, स्थलांतरे, रंगभेद, कलह, समजुती इत्यादी अनेक रोचक व आवश्यक जिज्ञासेचे व उपयोगाचे विषय यथार्थपणे समजण्यास घराण्याचे

सून विपुल लाभ होणार. अशी सामग्री हातीं असली म्हणजे मग कल्पनेचे ाम सोडावे लागत नाहीं. नीट वाटेने सत्याकडे जाता येते. सामाजिक मीमांसेचे यन सिद्ध करण्यास घराण्यांचे इतिहासच कच्चा माल पुरवितात. पुढील काम लोत्रीजनांचे आहे. सौर फाल्गुन ५-८२ रंगपंचमी, पुणे.

कुलवृत्त Dr. P. K. Gode, M. A. D. Litt, Family histories are the very कुलasis of National histories.

**डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे** M. A. D. Sc. रँग्लर. भावे कुलवृत्तांताचे स्वागत करताना लिहितात : माझे मित्र रा. गोविंदराव भावे यांनी आग्रह केल्यामुळे या ग्रंथाचे स्वागत करण्याच्या उद्देशाने हे दोन शब्द लिहीत आहे...भावे कुलातील कित्येक व्यक्तींशी माझाही संबंध झालेला आहे. मी सोळा वर्षांचा असताना माझे पहिले लग्न झाले ते एका भावे कुलातील मुलीशी. विलायतेत असताना ती सात आठ वर्षांतच वारली तरीही तिच्या माहेरच्या लोकांकडे आमचे येणेजाणे कायम राहिले. त्यामुळे तर भावे कुलाबद्दल मला विशेष आपलेपणा वाटतो.


अलिकडे महाराष्ट्रांत, विशेषतः कोकणस्थांत, निरनिराळया कुलांचे वृत्तांत प्रसिद्ध करण्याची प्रथा सुरू झाली आहे तीविषयी अनुकूल-प्रतिकूल मते प्रदर्शित केली जातात. कित्येक लोक म्हणतात कीं, " असल्या खटपटीचा समाजशास्त्रदृष्टया तादृश उपयोग नाही; त्यामुळे वित्ताचा व बौद्धिक शक्तीचा अपव्यय मात्र होत असतो; कोणत्याही एका कुलातील सर्व व्यक्तींत सामान्य गुणधर्म दिसून येणे अशक्य आहे; असले कुल हे पुरुषांपासूनच प्राप्त होत असल्यामुळे स्त्रियांपासून जे आनुवंशिक गुण माणसामध्ये येतात, गेल्य त्यांकडे दुर्लक्ष होते; पुरुषी गुणांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व दिले जाते व त्यामुळे सार जीवशास्त्रदृष्टया दिशाभूल होण्याचा संभव असतो. असल्या वृत्तांतांत पुरुष व्यक्तींचीच माहिती विशेषेंकरून दिली जाते, व समाजांतील स्त्रियांच्या स्थानांबद्दल जी बेफिकिरी " कु ती प्रचलित आहे तीच दृढावते; तसेच ऐतिहासिक दृष्टयाही असल्या वृत्तांताना कुलव असे महत्त्व नाही; प्रत्येक कुलातील काही थोडया व्यक्ती सोडून दिल्या तर बाकीच्यांची कारए ती कायम ठेवण्याचा प्रयत्न करण्यात अर्थ नाहीं; तसेच आपल्यामध्ये जुने कागद- एक फारसे शिल्लक नसल्यामुळे जुन्या काळच्या सामाजिक परिस्थितीबद्दलही फारशी उच माहिती सापडत नाही; व हे वृत्तांत म्हणजे निव्वळ नावांची जंत्री अशा स्वरूपाचे को होतात. "

असल्या आक्षेपांत थोडेबहुत तथ्य असले तरी देखील या ग्रंथांचे स्वागत करावें असें माझे मत आहे. हे ग्रंथ म्हणजे पहिल्या प्रतीचे ऐतिहासिक ग्रंथ असे म्हणता येत नसलें तरी देशाचा जर सर्वव्यापी इतिहास लिहावयाचा असेल तर त्यास नुसत्या पहिल्या दर्जाचे कागदपत्र पुरेसे होत नाहींत, कमीअधिक महत्वाची सर्व माहिती त्याकरिता लागते. सुंदर इमारत उठवावयाची असल्यास तिला दर्शनी संगमरवरी किंवा कोरीव कामच लागते असे नव्हे तर साधे दगड किंवा माती याचीही जरूरी असते, त्याशिवाय

इमारत व्हावयाची नाही; त्याप्रमाणेच असल्या वृत्तान्तांचा इतिहास लिहिताना उपयोग होईल.......

एका कुलाचा वृत्तान्त हा जरी सर्व समाजाचें पूर्ण चित्र दर्शविणारा नसला तरी समाजातील प्रत्येक व्यक्तीची माहिती मिळवून त्यापासून अनुमाने काढणें फार कठीण काम आहे......दोनचार कुलांच्या वृत्तान्ताचा निष्कर्ष एकच निघत असला तो तर कोकणस्थ जातीबद्दल निश्चित आहे असे समजण्यास हरकत नाही.

अशा रीतीनें ऐतिहासिक दृष्टया किंवा मानववंशशास्त्र दृष्टया असल्या वृत्तान्ताचा उपयोग असला तरी ही कामें याच उद्देशाने प्रेरित झालीं आहेत असे माझे म्हणणे नाही प्रत्येकाला आपल्या लोकांबद्दल थोडेबहुत कुतूहल असते. ते जरी शास्त्रीय दृष्टीने पूर्ण समर्थनीय नसले तरी त्याचे समाधान केल्याने मनास आनंद होतो. आपले पूर्वज कोण होते ? त्यांची राहणी कशी काय होती ? ते कोणता उद्योग करीत असत ? त्यांच्या चालीरीती काय असत ? वगैरे गोष्टी समजल्याने मनास एक प्रकारचे समाधान वाटते यात शंका नाही. प्रत्येकाच्या आवडीनिवडी सारख्याच असतात असे नाही व त्यांच्या विविधपणामुळेच जगात खरे स्वारस्य वाटते. त्या निरुपद्रवी असल्या तर त्यांच्याविषयीं दुसऱ्यास आक्षेप घेण्याचे काही कारण नाही. कादंबऱ्या वाचण्याने खरा उपयोग नाही असे समजून सर्व कादंबरीलेखकांस व वाचकांस दूषण देणें वेडेपणाचे होईल. त्याप्रमाणेच अशा ग्रंथांचे आहे. ते लिहिताना व वाचताना काहींच्या तरी जिवास आनंद होतो हे काही थोडेथोडके नव्हे. त्यापासून अप्रत्यक्षपणे दुसरे फायदे होतात हे त्यांचे आणखी एक समर्थन आहेच.....................पुणें ता. २५ सप्टेंबर, १९४०.



इ. स. १५९५ चे फर्मान

पृ. १ व लेखांक १ पहा

[illegible]

संदर्भ पृ. २३ व
लेखांक १० पहा